Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

**प्रेसनोट दिनांक – २२/०५/२०२४**

**दि. २०/०५/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी २५८/२०२४ भादवि कलम १४३, १४७, १४८, १४९, ३०७, ३२६, ३२३, ५०४, ५०६, ३४, आर्म अॅक्ट कलम ४(२५) व महा. पो अधि. ३७(१) सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/०५/२०२४ रोजी २०/३० वा चे सुमारास<br>रिलॅक्स मेडीकल समोर, शिवाजीवाडी चौक, मोशी पुणे याठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि२१/०५/२०२४ रोजी ०२.४० वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय १८ वर्ष धंदा शिक्षण रा. शिवाजीवाडी मोशी ता. हवेली जि पुणे |
| आरोपी | :- | १) रोहन रविंद्र नजन वय २० वर्ष रा. शिवाजीवाडी मोशी पुणे<br>२)ऋषिकेश नागनाथ तेलंग वय १९ वर्ष रा. सदर व त्यांचे<br>३)चार अनोळखी साथीदार (नाव पत्ता माहिती नाही)<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा भाऊ अनिल याचे वाढदिवसाकरता केक आणला नाही म्हणुन फिर्यादी चे भाउ अनिल याने आरोपी क्रं १ याचे कानाखाली मारल्याचा राग मनात धरुन, आरोपी क्र १ याने लाकडी दांडक्याने फिर्यादीचे भावाचे डावे गालावर मारुन जबडा फ्रॅक्चर करुन तसेच बाबा शेख यास लाकडी दांडक्याने मारुन व रोहन याचा मित्र (नाव माहिती नाही) याने लोखंडी कोयत्याने फिर्यादीचा भाऊ अनिल यास थांब आता तुला जिवंत सोडत नाही तुला संपवुनच टाकतो असे म्हणुन डोक्यावर जोराचा वार करुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. भाऊ अनिलचा मित्र बाबा शेख यास आरोपी क्र १ व २ व त्यांचे इतर चार अनोळखी साथीदारांनी लाथाबुक्यांनी मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पठारे ८८८८८१०९५७ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ६३९/२०२४, भा.दं.वि कलम ३२६,४५२, ३२३,५०४, ५०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २०/०५/२०२४ रोजी रात्री २२/३० वा चे सुमारास स नं २८/१/२, गोकुळ धाम, मधुबन कॉलनी गल्ली नं २, जगताप डेअरी साई चौक, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०५/२०२४ रोजी २१/५२ वा. |
| फिर्यादी | :- | सोमनाथ अशोक तांबे वय ३८ वर्षे धंदा गाडयांची खरेदी विक्री रा. स नं २८/१/२, गोकुळ धाम, मधुबन कॉलनी गल्ली नं २, जगताप डेअरी साई चौक, पुणे |
| आरोपी | :- | १)पंकज दांगट,२)कौस्तुभ दांगट व त्यांचे सोबत आलेले ३)दोन साथीदार पुर्ण नाव पत्ता माहिती नाही.<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांची पत्नी व आईसह घरी हजर असताना आरोपी नामे पंकज दांगट याने फिर्यादीस त्यांचे मामुर्डी येथील जागेबाबत बोलणी करण्यासाठी इसम नामे प्रकाश भोसले व सचिन भाऊ दांगट यांनी भेटायला पाठविले आहे असे फोनवर सांगुन पंकज दांगट, कौस्तुभ दांगट व त्यांचे सोबत इतर दोन मुले त्यांचेकडील इनोव्हा कारमध्ये बसुन फिर्यादीचे घरी येऊन त्यांचेशी जागेबाबत बोलणी करुन फिर्यादी कडील जागेचे पेपर पाहुन आरोपी नामे पंकज दांगट हा फिर्यादीस म्हणाला की, तु या जागेत येऊ नकोस, नाहीतर तुला आम्ही जिवंत सोडणार नाही, तुला त्याच जागेच जिवंत जाळुन टाकीन, तु कोर्टातील दावा गुपचुप पाठीमागे घे असे फिर्यादीस धमकावले असता फिर्यादीने त्याला असे विचारण्याचा त्याला अधिकार नाही असे म्हणाले असता पंकज दांगट याने त्याच्या हातातील कडया सारख्या वजनदार वस्तुने फिर्यादीचे उजवे डोळयावर, नाकावर, उजवे डोळयाचे खाली, उजव्या हातावर, तसेच कपाळावर मारुन गंभीर जखमी केले तसेच कौस्तुभ दांगट व इतर दोघांनी मिळुन फिर्यादीला हाताने तसेच लाथा बुक्क्यांनी मारहाण केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गायकवाड ९५५२५४६१३१ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी २३९/२०२४, भादविक ३०६,३८५, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० क ६६(क)(इ),६७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि .१५/०५/२०२४ रोजी रात्री ०९.३० वा सुमारास फलॅट नं १००१/डी २,स्टेला सोसायटी, डुडूळगाव ,ता हवेली जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०५/२०२४ रोजी २१.४९ वा |
| फिर्यादी | :- | सौरभ शरद विरकर, वय २६, धंदा -नोकरी, रा.सावंत निवास, गजानन कॉलनी, ताथवडे रोड, ताथवडे,ता मुळशी, जि पुणे |
| आरोपी | :- | सुरजकुमार व इतर इसम व खालील मोबाईल नं १)९१९५५२३८९८५ २)९३३०६९९३७९ ३)९२२९३७१७८७ ४)९१४२८६०११५ ५)९००७७२७४१० ६)७०४४१५७४९९ |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा मावस भाउ नामे किरण नामदेव दातिर, वय ३५ वर्ष याने राहते घराचे हॉलमध्ये पंख्याला ओढणीचे सहाय्याने गळफास घेवुन आत्महत्या केली असुन त्यास वरील वर्णनाचे मोबाईल क्रमांकावरील इसमांनी फिर्यादी यांच्या भावाचा व्हॉटसअॅपचा डीपी काढुन त्याचे फोटोची छेडछाड करून त्याचाच फोटा चित्र विचित्र अवस्थेत बनवुण त्यालाच व्हॉटसअप करून त्यांला वारंवार कॉल करून पैसे मागीतले व अगोदर २०००/-रुपये मागितलेनंतर १०,०००/-रु बँक खात्यावर स्विकारून पुन्हा वेगवेगळया फोनवरून कॉल करून त्याला ब्लॅकमेल करून पुन्हा त्याचेकडे ५१ लाख रू दे नाहीतर हे सर्व फोटो गुगलवर टाकु आणि तुला बदनाम करू अशा धमकी दिली व ५१ लाख रूपयांची खंडणी मागुन फिर्यादीचा मावस भाउ किरण दातीर यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | वपोनि ढमाळ ८६५२०७२२०० |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी २५९/२०२४ भा.द.वि कलम ३२६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/०५/२०२४ रोजी १५.३० बोराडे इस्टेट हौसिंग सोसायटी समोरील दुकानासमोर, बोराडेवाडी मोशी ता.हवेली जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०५/२०२४ रोजी १०.४९ वा |
| फिर्यादी | :- | भिमराव उत्तम नवघरे वय ४२ वर्ष धंदा सेक्युरिटी रा. व्दारा- गणेश बोराडे, आकांक्षा हॉटेल शेजारी, बोराडेवाडी, मोशीता. हवेली जि. पुणे मुळपत्ता- मु.पो.वडद ता.जि.हिंगोली |
| आरोपी | :- | सुदेश बिहारीलाल केवट वय १९ वर्ष रा. बोराडेवाडी, मोशी ता. हवेली जि पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे बोराडे इस्टेट हौसिंग सोसायटी समोरील दुकानासमोर, बोराडेवाडी मोशी ता.हवेली जि.पुणे या ठिकाणी फिर्यादी हे गाय छाप घेवुन घरी जात असताना यातील आरोपी याने अचानक पाठीमागुन येवुन फिर्यादीचे मानेवर चाकुने वार करुन त्यास गंभीर जखमी केले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोनि गोडबोले ८७८८२५२५६५ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी २५९/२०२४ भा.द.वि.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ आर्म अॅक्ट ४(२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १९.०५.२०२४ रोजी रात्रौ ०७.४५ वा.चे सुमारास माता रमाई बील्डींग ओटास्किम निगडी पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०५/२०२४ रोजी ००/५६ वाजता |
| फिर्यादी | :- | आरबाज हुसेन तलफदार वय २४ वर्षे धंदा-रिक्षा ड्रायव्हर रा. भिमक्रांतीनगर झोपडपट्टी निगडी पुणे |
| आरोपी | :- | १) शंकर भालेराव वय २४ वर्षे रा.सम्राट बिल्डींग, ओटास्किम ,<br>२)बबल्या रणदिवे रा.चिकन चौक, ओटास्किम,<br>३)विशाल पायाळ रा.सम्राट बिल्डींग ओटास्किम, व<br>४) विशाल पाटोळे वय २२ वर्षे रा. सिध्दी विनायक बिल्डींग, ओटास्किम, निगडी<br>**आरोपी क्र १ व ४ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे पार्कीगमधुन रिक्षा आणणेकरीता गेले असता फिर्यादीचे ओळखीचे नमुद आरोपी हे त्या ठिकाणी आले व त्यांनी फिर्यादीला तु रियाज कोरबुचा माणुस आहे त्याचा स्टेटस कशाला ठेवतो. आमचा भाऊ मेला तुझा भाऊ मरणार असे म्हणून शिवीगाळ करुन आरोपी क्र २ याने त्याचे हातातील लोखंडी कोयता फिर्यादीचे डाव्या हातावर उलटा मारला व आरोपी क्र ३ याने त्याचे हातातील बांबु फिर्यादीचे उजव्या पायाचे गुडघ्यावर मारून जखमी केले. व आरोपी क्र १ व ४ यांनी फिर्यादीला हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन तुझे हातपाय तोडतो असे म्हणुन तु जर आमची कम्प्लेट दिली तर तुला सोडणार नाही अशी धमकी देवुन |

| | | |
|---|---|---|
| | | बबलु रणदिवे याने त्याचे हातातील लोखंडी कोयता हवेत भिरकावत व त्याचे सोबत असणारे तिघांनी मोठ मोठयाने आरडा ओरडा करत आंम्ही इथंले भाई आहे असे मोठमोठयाने ओरडुन तेथे जमलेले व तेथुन जाणा-या येणा-या लोकांमध्ये दहशत निर्माण करुन निघुन गेल.म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा केंगले ७०३८२२८४१० |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड २७५/२०२४ भादवि कलम २७९,३३७, ३३८ मो .वाहन कायदा.कलम १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २०/०५/२०२४ रोजी सायंकाळी ०४/०० वा.सुमारास बेंगलुर मुंबई हायवे मामुर्डी जकात नाका जवळ अंडरपास वरील रोड देहुरोड |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०५/२०२४ रोजी २१/१३ वा |
| फिर्यादी | :- | पुलनसिंग मंगलसिंग राजपूत वय -३२ वर्ष धंदा- मजुरी रा- सुखवणी कंपनी भुमकर चौक लेबर कॉलनी पिंपरी चिंचवड पुणे |
| आरोपी | :- | जितेंद् श्रीपत याधव वय.२८ वर्ष रा.ग्राम नसिंगंज पोस्ट-नसिंगगंज तह-बासी जि.सिंध्दाथनगर राज्य उत्तर प्रदेश<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा भाऊ लखनसिंग मंगल सिंग राजपुत वय-३८ वर्ष धंदा-मजुरी रा.शिवाजी नगर पुणे हा बेंगलुरु मुबंई हायवे मामुर्डी जकात नाका जवळ अंडर पासवरील रोड देहुरोड येथुन चालत रस्ता ओलांडत असतांना ट्रक क्रमांक एन.एल.०१.ए.सी.०९३९ यांच्यावरील चालक नमुद आरोपी याने त्याचे त्याब्यातील नमुद ट्रक रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन फिर्यादीचे भावाच्या अपघातास व त्याला गंभीर दुखापत करण्यास कारणीभुत झाला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा ठोकळे ९०७५५८४११० |

०७

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ३२३/२०२४ भादवि कलम ४२०,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन २०२२ पासुन ते जुलै २०२३ पर्यत स्पाईस अप इव्हेंट ॲड कास्टींग संस्था भोसरी कार्यालय येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०५/२०२४ रोजी २३/०४ वा |
| फिर्यादी | :- | मुमताज जब्बार शेख वय ५२, व्यवसाय गृहीणी, रा.सर्वेनं बी २३०, प्लॉट नं १९, संजय पार्क, विमान दर्शन हौसिंग सोसायटी ए आर पोर्ट रोड पुणे |
| आरोपी | :- | १) माही ऊर्फ आरती मनोछा वय ३२ वर्षे<br>२) रोहीत मनोछा वय ३८ वर्षे दोन्ही रा.दिल्ली (पुणे पत्ता माहीती नाही) ३) निता राजधानकौल वय ५० वर्ष रा.वाघोली पुणे<br>४) मृदुल शर्मा वय २९ वर्ष रा.इंदोर सध्या<br>५) संजु नंदा वय ३० वर्ष रा.आर पी नंदा ९७ एच बी.के.एस मार्ग डि.आय.झेड यरीया सेक्टर ४ न्युदिल्ली<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी स्पाईसअप इव्हेंट ॲड कास्टींग संस्था भोसरी येथे सदर संस्थेचे पदाधिकारी तसेच मॅनेजर नमुद आरोपी यांनी आपसात संगणमत करुन स्पाईसअप इव्हेंट ॲड कास्टींग या संस्थेच्या नावाखाली लहान मुलांचे कार्यक्रम आयोजित करुन जो कार्यक्रमात विनर होईल त्याला दुबईला जाणेची संधी मिळणार असे आमिष दाखवुन तसेच सदर कंपनीमध्ये गुंतवणुक करणेचे नावाखाली फिर्यादी यांचे १,३१,०००/ रुपये तसेच साक्षीदार नामे १) विशाल किसन जाधव वय ३२ रा.कसबा पेठ पुणे यांची रक्कम रुपये ५,७८,०००/-रुपये २) अंजुन ओएज खान वय ३७ रा. धनश्री आशियान प्लॉट नं ए ३०४ खांडेवाडी पुणे यांची २,२०,०००/- रुपये ३) अविनाश विठठलराव शिंदे रा.औंध पुणे यांची १,५०,०००/- रुपये ४) जगजित सिंग रा.केतन रेसिडन्सी मोशी यांची ८,००,०००/- रुपये ५) अनुप्रिता उन्मेष पाटील रा.डी २/२२ स्वामी समर्थनगरी सोसायटी लक्ष्मी नगर पुणे, यांची १,६०,०००/- रुपये अशी एकुन २०,३९,०००/-रुपये (वीस लाख एकोनचाळीस हजार रुपये) ची फसवणुक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खाडे ८२७५४५६७५५ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड २१५ /२०२४ भादवी कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३१/०५/२०२३ ते दि २९/११/२०२३ रोजी पर्यंत हवेली क्रमांक ०५ कामीनी हॉटेल समोर चिंचवड पुणे.व दुय्यम निबंधक कार्यालय मुळशी व पौड यांचे कार्यालय येथे घडला असे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०५/२०२४ रोजी २०/२९ वा. |
| फिर्यादी | :- | सौ. शर्मिला गणेश पाटील वय ४२ वर्ष व्यवसाय नोकरी रा.बिल्डींग डी, फ्लॅट नं ९०४ ग्रीन व्हॅली सोसायटी, माणकर चौक, वाकड, पुणे. |
| आरोपी | :- | १) संजय चंदनमल जैन २)आकाश संजय जैन ३)करुणेश संजय जैन ४)गोरख दौलत धनगर ५)प्रशांत भिकन गुरव ६)रामंचद्र आर लांडगे ७)दादासाहेब पोटभरे ८) प्रसाद शिंदे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ८ यांनी मिळुन कुलमुखत्यार पत्रदस्त क्र.३२८/२०२१ अन्वये यातील फिर्यादी यांचे पती गणेश दगडु पाटील यांनी आरोपी करुणेश जैन व आकाश जैन यांना त्यांचे मिळकतीचे कामाकरीता दिलेले कुलमुखत्यार पत्राचा गैरवापर फिर्यादीचे पती यांचे नावे असलेली मिळकत हडप करण्याचे उदे्शाने बनावट दस्त अस्तित्वात आणुन, खोटे आंगठे व सह्या करुन खरेदी खत नोंदवुन फिर्यादीस कोणाताही मोबदला न देता तो दिला आहे असे दाखवुन त्यांची आर्थीक फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गोडसे ७७९८८२५७१० |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ६३७/२०२४ भा.द.वि.कलम ३७०(३) ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि- २०/०५/२०२४ रोजी १९/२० वा. सुमारास शॉप नं- APPLE BEAUTY SALOON AND SPA ५०७, पाचवा मजला, रेनबो प्लाझा, शिवार चौक, पिंपळे सौदागर, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०५/२०२४ रोजी ०२.२९वा |
| फिर्यादी | :- | वैष्णवी विजय गावडे मपोहवा ब.नं. १३७७, वय ३६ वर्षे नेमणुक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | १)अक्षय धनराज पाटील वय २४ वर्षे रा. सध्या शॉप नं- ५०७, पाचवा मजला, रेनबो प्लाझा, शिवार चौक, पिंपळे सौदागर, पुणे (स्पा मॅनेजर)<br>२) रोहन विलास समुद्रे वय अं. ३५ वर्षे रा. संत तुकाराम नगर, पिंपरी पुणे (स्पा चालक मालक)<br>३) भुषण पाटील वय अं. ३० वर्षे रा. रहाटणी पुणे (स्पा चालक मालक)<br>**आरोपी क्र १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी संगणमत करुन स्पा सेंटरचे नावाखाली पिडीत २ महीला यांना पैशांचे अमिष दाखवून त्यांना स्पा मसाज सेंटरचे नावाखाली प्राप्त करून वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करुन त्यांचेकडून वेश्याव्यवसाय करवून घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना आढळुन आले तसेच वरिल आरोपी यांनी सार्वजनिक ठिकाण असतांना देखील त्यांनी वरिल स्पामध्ये वेश्याव्यवसाय चालवला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गायकवाड ९५५२५४६१३१ |

१०

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ६३८/२०२४ भारताचा शस्त्र अधिनियम १९५९ चेकलम ३,२५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १४२, ३७(१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २१/०५/२०२४ रोजी १७.०५ वा.चे सुमारास कस्पटे चौकाकडुन काळेवाडी फाटाकडे येणारे रोडवर सॉलीटेअर बिझनेस हब बिल्डींगचे बाजुला मोकळ्या जागेत, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०५/२०२४ रोजी २०/०८ वा |
| फिर्यादी | :- | विक्रांत चिंतामण चव्हाण, पो.हवा. १४९६, नेमणुक- वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड.मो.नं. ७३८५६००२१७ |
| आरोपी | :- | राजेंद्र ऊर्फ राजा काशीनाथ वाडघरे, वय ३५ वर्षे, रा. म्हातोबानगर, दत्तमंदीर रोड, वाकड, पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी वाकड पोलीस स्टेशन कडील तडीपार नमुद आरोपी नामे याने यास त. आ. क्र. |

२६/२०२४, म. पो. का. ५६(१) (ब), दि.०२/०४/२०२४ अन्वये १२ महीने तडीपार केले असताना या कालावधीत कोणाचीही परवानगी न घेता पिंपरी चिंचवड हद्दीत प्रवेश करून त्याचे कब्जात बेकायदा बिगर परवाना एक ५०,०००/-रु किंमतीचे पिस्तुल व एक २०००/- रु किंमतीचे जिवंत काडतुस हे अग्निशस्त्र त्यावर केंद्र शासनाने ठरविल्या प्रमाणे बनविणाराचे नाव, निर्माणकाचा क्रमांक व अन्य ओळख चिन्हे नसलेले सदरचे पिस्तूल आपले कब्जात बाळगले असताना मिळुन आला. तसेच पिंपरी चिंचवड पोलीस नोटीस १३/०५/२०२४ भाग-१, परि. ४४७, पान नं. १०४९ मधील मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांचे आदेशान्वये, पोलीस आयुक्तलयामध्ये दिनांक १४/०५/२०२४ रोजी ००.०१ वा. पासुन ते दिनांक २७/०५/२०२४ रोजी २४.०० वा.पर्यंत दगड अथवा शस्त्रे, अस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, लाठी, बंदुका किंवा शारीरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु बरोबरनेणे अथवा बाळगणे बाबत मनाई आदेश असताना, सदर आदेशाचा भंग केला म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि सावर्डे ८८८८०२९९९१

११.

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी २६०/२०२४ भा.द.वि कलम ३७९, ५११, ४२७, ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२१/०५/२०२४ रोजी रात्रौ ०१/५० वाचे सुमारास एचडीएफसी बॅकेचे एटीएम सेंटर, भारत माता चौक, मोशी पुणे

गुन्हा दाखल :- दि२१/०५/२०२४ रोजी ११.११ वा

फिर्यादी :- उमेश लक्ष्मण लामखडे वय ३८ वर्ष धंदानोकरी रा. प्लॅट नंबर १०२, लाँग आयलॅण्ड सोसायटी, प्राईड वर्ड सिटी, च-होली बु ता हवेली जि पुणे

आरोपी :- दोन अनोळखी इसम त्यांचे वर्णन
१)एकाने अंगात पिवळया रंगाचा शर्ट घातलेला, डोक्याचे केस बारीक, डोळे मोठे, मिशी राखलेली,
२) दुसरा इसम अंगात निळया रंगाचा टी शर्ट व राखाडी रंगाची पॅन्ट घातलेला

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी एचडीएफसी बॅकेचे एटीएम सेंटर, भारत माता चौक, मोशी पुणे याठिकाणी नमुद वर्णनाचे दोन अनोळखी इसमांनी चोरी करण्याचे उद्देशाने प्रवेश करुन, एटीएम सेंटर मधील कॅमेरे लाकडी दांडक्याने तोडुन, एटीएम मशीनचा दरवाजा, प्रेझेंटर, मॉनीटर व सेफ्टीकुलुप तोडुन चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पानसरे ७२१८१९५२६७